(९७)

॥ जय हिंद माता ॥

## —: शाहीरी — डफ :—

## पुष्प १४ वें

**महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय, जळगांव पू. खा.**

## — लोकगीत —

# असावा नसावा

शाहीर बाका । शब्दाचा नौखा । जगात ठेका असावा । ज्ञानाचा अंधा मतिचा मंदा । कैफाचा धंदा नसावा ॥१॥ गावांत शहाणा । पेवांत दाणा । तेल्याला घाणा असावा । अडाणी पोहणार । रिकामा कावणार । आघोरी जेवणार नसावा ॥२॥ ब्राम्हणाला तुळस । गुरवाला पळस । शिखराला कळस असावा । सभेत मुर्दाड । अडाणी सरदार । लाचेचा कामगार नसावा ॥३॥ नदीला पाणी । पेठेला वाणी । गावाला धनी असावा । बोलून गोड । आतून दोड । गळा कापणार नसावा ॥४॥ लेकीला सासरा । बैलाला कासरा । घराला आसरा असावा । मर्दाला भांग । तोंडावर वांग । चोराचा संग कधी नसावा ॥५॥ गावाला चावडी । घराला बावडी । ढोराला गोठा असावा । दारात सर्डा । खाण्यात करडा । चोराला खोकला नसावा ॥६॥ घराला परडी । तेल्याला करडी । कुणब्याला हुर्डा असावा । जावाई रेडका । वाणांत पडका । सासूचा लाडका नसावा ॥७॥ भुकेला कोंडा । निजायला धोंडा । पालखीला गोंडा असावा । बोलण्यांत घाणेरा । दातांनी बोचरा । शेतात धोतरा नसावा ॥८॥ चारा थडीचा । पाटील गढीचा । गोपाळ उडीचा असावा । हंसात बगळा । पिंजऱ्यात कावळा । राघूत पिंगळा नसावा ॥९॥ दारात आडाणा । पिऱ्याला झोडणा । म्हशीला लोढणा असावा । पेठेला अतार । रिकामा सुतार । आणिक बेलदार नसावा ॥१०॥ निजायला बाज । नटायला साज । पठ्याला हात सदा असावा । थोराशी भांडणार । पंचाच मोडणार । रिकामा शिलेदार नसावा ॥११॥ धन्याला चाकर । कामाला वेळेवर । शेतात नांगर असावा । गावांत आजार । शेतकरी बेजार । भूताचा शेजार नसावा ॥१२॥ सुखाचा संसार । धंदा पाणी रोजगार । गावाला बाजार असावा । गावांत तंटा । रानांत घंटा । कुळाला बट्टा नसावा ॥१३॥ खाण्याला आंजीर । कमरेला खंजीर । डोईला मंदील असावा । लढाईत भित्रा । बायकांत कुत्रा । नशाबाज माणूस नसावा ॥१४॥ घराला अडसर । घोड्याला नोकर । पायाला पायजर असावा । बायकात लांडा । रिकामा हांडा । लग्नांत हुंडा नसावा ॥१५॥ आंगरखा

धडका । खिरयात आडका । दिसण्यांत नेटका असावा । रस्त्यात बोडखा । अंगान रोडका । कामात रडका नसावा ॥१६॥ मनगटी पक्का । शत्रुला बुक्का । देणार शिलेदार असावा । दुष्टाचा शेजार । कंजुष मालदार । चहाडखोर माणूस नसावा ॥१७॥ अन्नाचा निंदा । विद्येचा बंदा । मिठाला जागणार असावा । धन्याशी बेमान । वृथा अभिमान । गुरुचा निंदक नसावा ॥१८॥ छातीला भरदार । मनाचा दमदार । देण्याला उदार असावा । मनाचा कुजका । गावात बुजका । रिकामा ठसका नसावा ॥१९॥ ढोराला चारा । खळ्याला वारा । शेतास खत पाणी असावा । उराला धक्का । डोळ्याला बुक्का । दुधाजवळ बोका नसावा ॥२०॥ पदर डोक्याला । कास्टा बायकांना । पाहारा वेशीला असावा । गर्तीला नखरा । वेश्येला आसरा । कुंटिणिचा शेजार नसावा ॥२१॥ कुंकवाला आधार । सज्जनाचा शेजार । मर्दाला संग सदा असावा । खोगीर गाढवा । पाटील कडवा । धर्माला आडवा नसावा ॥२२॥ नदीला तारु । गांवात कारु । पागेत घारु असावा । दारात हुडवा । घोडात कडवा । रस्त्यात आडवा नसावा ॥२३॥ कारकून फर्डा । लिहिण्यांत करडा । घरांत थेरडा असावा । सावकार लुच्चा । दिलाचा कच्चा । शेतात बरडा नसावा ॥२४॥ गाण्यांत चुटका । थोडक्यात फटका । बोलण्यांत फर्डा असावा । रचनाही मजेदार । शाहीर झोकदार । फुकटाचा ऐकणार नसावा ॥२५॥

---

## पुष्प १५ वें

### भैरवी

चालः– ( याहो राजसा या )

याहो शिवराया या ऽऽऽ याहो ।
पाहू किती राया वाट आता ॥

### अंतरा

दाटली ही निराशा तोडी ऽऽ परदास्यता ।
स्वतंत्रता ही लोपली,
चंद्रमौली संकटी घे उडी घे भूवरी ॥१॥

लेखकः– महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय.